ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 173

वर्ष ३८ पुणे, बुधवार, १६ फेब्रुवारी, १९७२ अंक ४




Dattaram-SRP-1

**प्राचीन कलावस्तू जप्त**—पाकिस्तानातील कुप्रसिद्ध २२ मोठ्या श्रीमंत घराण्यांनी अनेक मार्गांनी संपत्ती मिळविली. ह्या घराण्यात सेवानिवृत्त ले. जनरल हबीबउल्लाखान ह्यांचेही घराणे आहे. खानसाहेबांच्या मोठ्या शेतवाडीवर पाकिस्तानच्या कस्टम्सच्या अधिकाऱ्यांनी नुकतीच धाड घातली. धाडीत त्यांना २५ प्राचीन कलावस्तू सापडल्या, त्यांची किंमत २५ लाख रु. तरी असावी. वस्तू तक्षशिला आणि गांधार ह्या प्राचीन नगरींतून आणलेल्या होत्या.

**निर्वासितांसाठी मदत द्या**—संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या निर्वासित कमिशनरला भारताने बांगला देशातून आलेल्या निर्वासितांसाठी केलेल्या खर्चाचा आकडा कळविला आहे. निर्वासितांची संख्या एक कोटीपर्यंत पोचली होती. त्यांच्या किमान गरजा पुऱ्या करण्यासाठी भारताला ३३९.४५ कोटी रुपये खर्च करावे लागले आहेत.

**देना बँक–अमर डाय केम लि.**—देना बँक लि. चे अमर डाय केम. लि. मध्ये विलिनीकरण होण्याचे ठराव दोन्ही बोर्डांनी मंजूर केले आहेत. ला. इं. कॉर्पोरेशन त्या योजनेची छाननी करीत आहे. देना बँकेच्या भागभांडवलापैकी ४३% भांडवल ला. इं. कॉर्पोरेशन व इतर आर्थिक संस्था धारण करीत आहेत.

**एल. आय. सी. चा बोनस**—लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनने ३१ मार्च, १९७१ अखेरच्या दोन वर्षांसाठी हयातीमधील विम्यास दर साल दर हजारी १७.६० रु. आणि हयातीनंतरच्या विम्यास दर साल दर हजारी २२ रु. बोनस जाहीर केला आहे. हा बोनस देण्यासाठी एकूण ११५.९८ कोटी रु. नफ्यापैकी ११०.१८ कोटी रुपयांचा विनियोग केला जाईल. मूल्यमापनाचे दिवशी कॉर्पोरेशनकडे ७१८५.८३ कोटी रु. चे १४७.८५ लक्ष विमे चालू होते.

**टेलिव्हिजन सेट्स आणण्यास बंदी**—जे उतारू परदेशांत तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ राहिलेले नाहीत, अशांना येताना स्वतःबरोबर टेलिव्हिजन सेट आणता येणार नाही. ज्या उतारूंचा स्वतःच्या मालकीचा टेलिव्हिजन सेट नाही, अशांना तो आयात करता येईल, पण तो पाच वर्षेपर्यंत विकता येणार नाही.

**फोनोग्रॅमची प्रत हवी आहे का?**—फोनोग्रॅम करते वेळीच जर त्याची कन्फर्मेटरी प्रत हवी असल्याचे सांगितले, तर तशी प्रत पुरविली जाईल. फोनोग्रॅमच्या चार्जमध्ये ह्या प्रतीचा ८० पैशांचा चार्ज समाविष्ट केला जाईल.

**हुगळी पुलासाठी २८ कोटी रु. ची मागणी**—कलकत्त्याजवळ ३,२०० फूट लांबीचा नवा हुगळी पूल बांधण्यासाठी प. बंगाल सरकारने केंद्र सरकारकडे २८ कोटी रु.ची मागणी केली आहे.

**परदेश प्रवासासाठी परदेशी हुंडणावळ**—एप्रिल ते नोव्हेंबर, १९७१ ह्या आठ महिन्यांत रिझर्व्ह बँकेने तांत्रिक अभ्यासासाठी परदेशी जाणाऱ्या १,४०८ विद्यार्थ्यांना २.४८ रुपयांची परदेशी हुंडणावळ मंजूर केली. बिगर-तांत्रिक अभ्यासासाठी जाणाऱ्या १,०९२ विद्यार्थ्यांना १.१६ कोटी रुपयांची परदेशी हुंडणावळ मिळाली. अभ्यासाव्यतिरिक्त कामासाठी जाणाऱ्या ११,९३१ लोकांना ७.०८ कोटी रुपयांची परदेशी हुंडणावळ मिळाली. त्यापैकी ८,१७७ लोकांना दिलेली ४.९० कोटी रु. ची हुंडणावळ व्यापाऱ्यांसाठी होती.

**ग्रामोफोन तबकड्यांची निर्गत वाढली**—१९७०–७१ मध्ये भारताने ४३ लक्ष रुपयांच्या ग्रामोफोन तबकड्यांची निर्गत केली. त्यापूर्वीच्या वर्षीपेक्षा निर्गत २२% नी जास्त झाली.

**५० पैशांचे नवे नाणे**—५० पैशांचे कप्रो-निकेलचे नवे नाणे १४ फेब्रुवारी रोजी प्रचारात आले. त्याचे वजन ५ ग्रॅम असून त्यात ७५% तांबे आणि २५% निकेल आहे. सध्याचे ५० पैशांचे १००% निकेलचे नाणेही प्रचारात राहील.

**जपानची अणुचालित बोट**—जपान अणुशक्तीच्या साह्याने चालणारी बोट बांधत आहे. बोटीचे नाव मुत्सु असे असून ती जवळजवळ पूर्ण होत आली आहे. बिगरलष्करी स्वरूपाची आणि अणुशक्तिचलित अशी ही जगातील चौथी बोट आहे. बोट बांधण्यासाठी सुमारे ५ कोटी डॉलर्स खर्च येणार आहे. अणुभट्ट्यांसाठी लागणाऱ्या जळणाचे उत्पादन करण्याचा पहिलावहिला कारखानाही जपानने स्थापन केला आहे. जपानमध्ये अणुबीज उत्पन्न करणारे चार कारखाने आहेत.

**मुजीब कोट**—बांगला देशातील सरकारी कचेऱ्यातून ह्यापुढे सूट आणि नेकटाय दिसणार नाहीत. 'मुजीब कोट' आणि पायजमा किंवा विजार हा अधिकृत पोषाक राहिल. उन्हाळ्यात, 'मुजीब कोटा'स बाह्या असणार नाहीत.

**बांगला देशाची तांदळाची गरज**—बांगला देशाला दरमहा २ लक्ष टन तांदूळ लागेल आणि तो भारतातून पाठवावा लागेल. गहू, गव्हाचे जिन्नस, साखर, मीठ, आगपेट्या, केरोसीन, जवसाचे तेल, कापड, साबण, कागदी सामान, औषधे, वनस्पती, कोळसा, सिमेंट, लोखंड, पोलाद, इत्यादींचाही तेथे तुटवडा पडेल.

**युनिट ट्रस्टच्या रोख्यांची विक्री**—ऑक्टोबर-डिसेंबर १९७१ ह्या तिमाहीत ५,४३५ नव्या अर्जदारांनी १.९८ कोटी रु. चे रोखे घेतले. १९७० च्या तत्सम मुदतीत ४,३२६ अर्जदारांनी १.७५ कोटी रु.चे रोखे घेतले होते. आता ४,१०,२२६ रोखेधारकांजवळ १०१ कोटी रु. चे युनिट ट्रस्ट रोखे आहेत.

**पुरामुळे दर साल १२६ कोटी रु. नुकसान**—१९५३ ते १९७१ ह्या काळात पुरामुळे भारताचे २,४८० कोटी रु. चे नुकसान झाले, असे सरकारी आकडेच सांगतात.

☆ अर्थ ☆

बुधवार, १६ फेब्रुवारी १९७२



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## खाजगी उद्योगधंद्यांवर नियंत्रण ठेवण्याचा विचार

हिंदची अर्थव्यवस्था मिश्र ह्या संज्ञेने ओळखली जाते; म्हणजे तीत सार्वजनिक मालकीच्या व खाजगी मालकीच्या अशा दोन्ही प्रकारच्या औद्योगिक संघटनांना स्थान आहे. ह्या मिश्र अर्थव्यवस्थेच्या कल्पनेत आता हळूहळू बदल घडून येणार असे दिसते. गेल्या काही वर्षांत काही खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना आयुर्विमा कॉर्पोरेशन, युनिट ट्रस्ट आणि राष्ट्रीयीकरण झालेल्या बँका ह्यांनी भांडवल पुरविलेले. ह्या व अशा प्रकारच्या वित्तीय संघटनांचा पैसा म्हणजे लोकांचा पैसा असतो. तेव्हा ज्या खाजगी उद्योगधंद्यांनी सार्वजनिक स्वरूपाच्या वित्तीय संघटनांकडून द्रव्यसाह्य घेतले असेल त्यांच्या कारभारावर सरकारी नियंत्रण ठेवण्याचा विचार पुढे येत आहे. निदान अशा महत्त्वाच्या उद्योगधंद्यांवर तरी सरकारचे प्रभावी नियंत्रण असावे असा विचार सरकारी गोटात बळावत आहे. देशातील महत्त्वाच्या उद्योगधंद्यांतील भांडवलाची रचना कशा प्रकारची आहे ह्यासंबंधी भारत सरकारचे कंपनी लॉ ॲडमिनिस्ट्रेशन खाते सध्या माहिती जमवून अभ्यास करण्यात गुंतले आहे. अभ्यास पूर्ण झाल्यावर ह्या विषयासंबंधी काही तरी निर्णय घेणे सरकारला शक्य होईल. ह्याचा अर्थ खाजगी मालकीच्या औद्योगिक संघटना पूर्णपणे नष्ट करण्यात येतील असा मात्र नाही. उलट देशाच्या औद्योगिक जीवनात त्यांनी परिणामकारक भाग घ्यावा असाच सरकारचा हेतू असल्याचे सांगण्यात येत आहे. देशातील बऱ्याच मोठ्या उद्योगधंद्यांना सार्वजनिक विभागातील वित्तीय संस्थांनी मोठ्या प्रमाणावर भांडवल पुरविले आहे. पण त्यांचा कारभार आणि नियंत्रण मात्र काही थोड्या व्यक्तींच्या हातात एकवटलेली आहेत. ह्याचा परिणाम असा झाला आहे की राष्ट्रीय हित फारसे न साधता काही व्यक्तींचा अगर गटांचा मात्र फायदा होत आहे. ह्या परिस्थितीत बदल घडवून आणणे सरकारला इष्ट वाटत आहे.

## आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या दृष्टिकोनात बदल

आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या दृष्टिकोनात बदल घडून येत असल्याचे दिसून येत आहे. ह्या व्यवसायाचा व्यवहार निरनिराळ्या विमाकंपन्यांकडे हो । तेव्हा अधिकाधिक नवा धंदा मिळविणे, विमेदारांना बोनस देणे आणि भागीदारांना नफा वाटणे एवढ्या पुरतेच प्रयत्न होत असत. आयुर्विमा कॉर्पोरेशनने ह्या बाबींकडे दुर्लक्ष केले आहे असे नाही. परंतु ह्या व्यवसायातून सामाजिक हित साधण्याचीही दृष्टी ठेवली आहे. आता कॉर्पोरेशनची एक स्थिरपद संघटना तयार झाली असून अधिकाधिक लोकांना विमा उतरविण्यास प्रवृत्त करण्यात येत आहे. त्याचा परिणाम नवा धंदा मिळविण्यात कॉर्पोरेशनने घोडदौड केली आहे. गेल्या वर्षी १,००० कोटी रुपयांचा नवा धंदा मिळविण्यात आला असून कॉर्पोरेशनच्या इतिहासात प्रथमच धंद्याच्या वाढीचा वेग ३० टक्क्यांपर्यंत आला आहे. पूर्वी जे लोक जोखमीचे व्यवसाय अगर उद्योग करीत असत त्यांचे विमे स्वीकारण्यात येत नसत अगर विम्यासाठी आकारण्यात येणारे हप्ते जबर असत. त्यामुळे असे अनेक लोक देशहिताची कामे करीत असताना सुद्धा विम्यामुळे मिळणाऱ्या संरक्षणाला मुकत असत. आता अशा लोकांचे विमे इतर मामुली व्यवसायांतील लोकांप्रमाणेच स्वीकारण्यात येतात. विमा कॉर्पोरेशनचे पैसे गुंतविण्याचे धोरणही बदलण्यात आले आहे. पैसे गुंतवताना आता सामाजिक हिताला प्राधान्य देण्यात येऊ लागले आहे. परिणामी विमेदारांचा पैसा आता अधिक प्रमाणात गृहनिर्माण योजना, विजेच्या निर्मितीचे बोर्ड, अशांसारख्या सामाजिक उपयुक्ततेच्या कामात गुंतविण्यात येऊ लागला आहे. गृहनिर्माण-योजना कमी खर्चात कशा होतील त्याचा अभ्यास करण्यासाठी कॉर्पोरेशनने एक परिसंवाद भरविला होता. त्याचप्रमाणे वीजमंडळांची एक परिषदही भरविण्यात येणार आहे. ग्रामीण वीजपुरवठा व कार्यक्षमता ह्यांचा विचार तीत होणार आहे.

## नोबेल पारितोषिक मॉस्कोत घेण्यास हरकत नाही.

सुप्रसिद्ध रशिअन कादंबरीकार अलेक्झांडर सॉल्झेनित्सिन ह्यांना १९७० सालचे वाङ्मयाचे नोबेल पारितोषिक देण्यात आले होते. पारितोषिक देण्याच्या समारंभाला ते स्टॉकहोम येथे हजर राहिले नाहीत. रशिआला परत येऊ दिले जाणार नाही अशी भीती त्यांना वाटत होती. त्यानंतर पारितोषिक मॉस्कोतच दिले जाण्यासाठी त्यांनी खटपट केली होती. ह्या प्रकरणासंबंधी मॉस्कोतील पत्रकार परिषदेत बोलताना रशिआचे सांस्कृतिक मंत्री ह्यांना अशी विचारणा करण्यात आली की पारितोषिक मॉस्कोत देण्यास काही हरकत आहे काय? त्यावर त्या म्हणाल्या की अशी बंदी घालण्यात आलेली नाही. तेव्हा पारितोषिकाचा स्वीकार करण्यासाठी खास परवानगीची जरूरी नाही. ह्या प्रश्नासंबंधी पूर्वी प्रश्नोत्तरे झाली होती. त्या बेटी मंत्र्यांना राग आलेला वार्ताहरांनी नमूद केलेला आहे.

### पैसा शेतीच्या उत्पन्नातूनच उभारावा लागेल.

फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे अध्यक्ष श्री. कानोरिआ ह्यांनी संघटनांतर्गत उपसंघटनांच्या अध्यक्षांना एक पत्रक पाठविले आहे. त्यात ते म्हणतात की देशातील सध्याची भांडवल-उभारणीची परिस्थिती लक्षात घेतली तर अधिक पैसा गुंतवणुकीसाठी गोळा करावयाचा असल्यास शेतीच्या उत्पन्नातूनच तो जमवावा लागेल; मग तो गोळा करण्याचे उपाय करविषयक असोत अगर इतर असोत. जादा पैसा उभारण्याचे काम मुख्यतः मध्यवर्ती सरकारच्या अंदाज-पत्रकाद्वारे केले जाते. हीच पद्धत चालू राहिली तर जादा पैसा गोळा करण्याचा मुख्य भार उद्योगधंद्यांवर आणि खाजगी बचतीवर पडेल. परंतु त्यामुळे उपलब्ध होणारा पैसा घटेल व गुंतवणुकही कमी होऊ लागेल. अशा परिस्थितीत शेतीच्या उत्पन्नातून पैसा जमविण्याचा धीट उपाय सरकारने निश्चयाने अमलात आणला पाहिजे. पंतप्रधान इंदिरा गांधी ह्यांनी युद्धाच्या वेळी देशाचे नेतृत्व थंडपणाने व धैर्याने केले. आता स्वावलंबनासाठीही त्यांनी देशाला जोराचा धक्का दिला पाहिजे. हे स्वावलंबन देशाच्या उद्योगधंद्यांतूनच उगम पावणार आहे. तथापि स्वावलंबन ह्याचा अर्थ जगापासून अलिप्त राहिलेली अर्थ-व्यवस्था असा मात्र करता येणार नाही. ज्या उत्पादनाच्या बाबतीत देशाला निसर्गतःच अनुकूल परिस्थिती लाभली आहे त्याच बाबतीत स्वावलंबन शक्य आहे. ह्या क्षेत्रातच आयाती-पासून स्वतंत्र होता येईल. नाहीतर अर्थव्यवस्था फार महागडी होईल आणि देशांतर्गत साधनांचा जास्तीत जास्त उपयोग करता येणार नाही. ह्यासंबंधी सरकारने ५४ उद्योगधंद्यांना उत्पादन वाढविण्याची मुभा दिली आहे, ती स्वागतार्ह आहे. मोठ्या उद्योगधंद्यांना मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली तर परवाना पद्धतीची गरज भासणार नाही.

---

### पाकिस्तान इंटरनॅशनल एअरलाइन्सला जबर फटका

स्वतंत्र बांगला देश उदयाला आल्यापासून पाकिस्तान इंटरनॅशनल एअरलाइन्सला फार मोठा आर्थिक फटका बसला आहे. ढाक्क्याकडे जाणारी विमाने बंद झाल्यामुळे एअरलाइन्सचे उत्पन्न ५० टक्क्यांनी घटले आहे. कंपनीजवळ ११ बोइंग जातीची विमाने आहेत. पण त्यातील ५ आता नकोशी झाली आहेत. ह्या विमानावर काम करणारा निम्मा नोकरवर्गही अनावश्यक ठरत आहे. अशा परिस्थितीत कंपनीला उत्पन्न वाढविण्यासाठी नवे पण अधिक अडचणी असणारे वाहतुकीचे मार्ग शोधावे लागणार आहेत. सध्या जगातील सर्व विमान कंपन्यांना वाईट दिवस आले आहेत. त्यांच्यात स्पर्धा वाढत चालली आहे. पाकिस्तानी कंपनीला अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी ह्या स्पर्धेत भाग घेणे कितपत परवडेल हे सांगता येत नाही. पाकिस्तान अखंड होते त्यावेळी ढाका हे प्रवासाचे एक केंद्र होते. शिवाय तेथून पाकिस्तानी विमाने पाच आंतरराष्ट्रीय मार्गांवर उड्डाण करीत असत. गेल्या वर्षीच्या प्रारंभी भारताने पाकिस्तानी विमानांना भारतीय प्रदेशावरून भ्रमण करण्यास मनाई केली होती. तेव्हापासून पाकिस्तानी विमाने सिलोन मार्गे ढाक्क्याला जात असत. हा मार्ग लांबचा असल्याने २॥ तासांच्या प्रवासाला ६ तास लागू लागले. परंतु त्यापासून कंपनीचा फायदाच झाला. ढाक्क्याला जाणारी विमाने नेहमी भरगच्च असत. प्रवासाच्या तिकिटाला ४२६ रुपयांऐवजी ९४० रुपये द्यावे लागू लागले. पाकिस्तानी नागरिकांना मात्र २५० रुपयात प्रवास करता येई. पुढे तिकिटाचा दर ३२५ रुपये करण्यात आला. पाकिस्तानी नागरिकांना द्यावा लागणारा आकार व तिकिटाचा पूर्ण आकार ह्यांमधील फरक कंपनीला पाकिस्तान सरकारकडून देण्यात येत असे. इतर परदेशी विमानांना हिंदी प्रदेशावरून जाण्यास मुभा असल्याने आता पाकिस्तानी कंपनीला स्पर्धा जाणवू लागेल.

---

### कुटुंबनियोजन विषयक शस्त्रक्रियांत मोठी घट

कुटुंब नियोजनासाठी करण्यात यावयाच्या शस्त्रक्रियांची संख्या १९६७-६८ सालापासून कमी कमी होत चालली आहे. गेल्या चार वर्षांतील ह्याविषयीच्या आकड्यांवरून ही गोष्ट स्पष्टपणे दिसून येते. १९६७-६८ साली १८ लाख, ४० हजार स्त्रीपुरुषांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या होत्या. त्यापुढील वर्षी शस्त्रक्रियांची संख्या १६ लाख, ८५ हजारावर आली. १९६९-७० साली १३ लाख, ७३ हजार शस्त्रक्रिया करण्यात आल्या आणि १९७०-७१ साली जास्तीत जास्त १२ लाख, ७५ हजार शस्त्रक्रिया करण्यात आल्या असाव्या असा अंदाज आहे. लोकसंख्येची वेगाने होणारी वाढ रोखण्यासाठी कुटुंबनियोजनाच्या कामासाठी करण्यात येणारा खर्च मात्र वाढत असलेला दिसतो. १९६७-६८ साली ह्या कामासाठी २७१ लाख रुपये खर्च करण्यात आले होते. १९७०-७१ साली ४६६ लाख रुपये खर्च करण्यात येणार होते. तथापि ह्या बाबतीत एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. शस्त्रक्रियांची एकूण संख्या घटत असली तरी पुरुषांपेक्षा स्त्रिया अधिकाधिक प्रमाणात संबंधित शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी पुढे येत आहेत. १९६७-६८ साली १ लाख, ९२ हजार स्त्रियांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या होत्या. त्या पुढील वर्षी २ लाख, ८२ हजार शस्त्रक्रिया करण्यात आल्या. स्त्रियांवरील शस्त्रक्रियांची संख्या जोराने वाढत चालल्याचे दिसून येते. १९६९-७० साली एकदम मोठी वाढ होऊन ३ लाख, ४१ हजार स्त्रिया शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी पुढे आल्या. १९७०-७१ च्या पहिल्या १० महिन्यांत तर ३ लाख, २५ हजार स्त्रियांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. कुटुंबनियोजनासाठी शस्त्रक्रियेशिवाय इतर मार्गांचाही अवलंब करण्यात येतो. पण इतर साधनांच्या उपयोगातही कमी-अधिक प्रमाणात घट होत आहे. महाराष्ट्रातील कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाचे चित्रही असेच आहे.

# श्री. चिं. वि. जोग ह्यांची जीवनमूल्ये

## कर्तव्याबाबत व्यापक दृष्टिकोनाचा आणि कर्तृत्वसंपन्नतेचा परिपाक

[ बँक ऑफ महाराष्ट्रचे कर्तबगार कर्णधार श्री. चिं. वि. जोग यांच्या एकसष्ठीनिमित्त 'दुर्वांकुर' हा गौरवग्रंथ त्यांची कन्या सौ. मीरा खेर यांनी संपादित व प्रकाशित केला आहे. "पूर्ण प्रकाशित सूर्यसदृश तेजस्वी असूनही दाहक नसणारे, पौर्णिमेच्या पूर्णचंद्रसदृश शीतल आणि स्निग्ध असूनही परप्रकाशित नसणारे ती. अप्पांचे गरुडझेपी कर्तृत्व शब्दांकित करणे वस्तुतः अशक्यप्राय गोष्ट. बँकिंगसारख्या धकाधकीच्या व्यवसायात सारे आयुष्य व्यतीत करूनही स्वतःचे स्नेहशील अजातशत्रुत्वाचे गुणवैशिष्ट्य अप्पांनी अबाधित ठेवले आहे, याचे मला राहून राहून आश्चर्यमिश्रित कौतुक वाटते. लोक कसेही वागले तरी आपली सांस्कृतिक पातळी कधी ठराविक मर्यादेच्या खाली घसरू द्यावयाची नाही, असा अप्पांचा बाणा आहे. मानवी जीवन म्हणजे सुखदुःखांची एक मालिकाच. या सुखदुःखांच्या अनुभवाशिवाय जीवन समृद्ध होत नाही. अप्पांचे जीवन अशा अनेकविध अनुभवांतून संपन्न झाले आहे." असे सौ. मीरा खेर यांनी आपल्या प्रास्ताविकात म्हटले आहे.

प्रस्तुत ग्रंथात श्री. चिं. वि. जोग यांनी "माझी जीवनमूल्ये" या लेखात स्वतःच्या दृष्टिकोनाचे आणि कर्तव्यनिष्ठेचे उत्कृष्ट दर्शन घडविले आहे. आपल्या वडिलांच्याकडून मिळालेल्या थोर सांस्कृतिक आणि समाजसेवेच्या वारशाचा त्यांनी कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला आहे. या लेखातील बहुतेक सर्व भाग येथे उद्धृत करण्यास आम्हांस विशेष आनंद होत आहे.

### सुयोग्य कर्जमंजुरी : यशाची गुरुकिल्ली

गेल्या ३७ वर्षांमध्ये बँकिंग धंदा यशस्वी कसा करावा यासंबंधी माझे अनुभवसिद्ध तत्त्वज्ञान बनले गेले आहे. या तत्त्वज्ञानाचे कठोर पालन हे महाराष्ट्र बँकेच्या आजच्या प्रतिष्ठेचे रहस्य आहे, असे मला वाटते. समकालीन बँकांच्या यशापयशाचे मूल्यमापन करता, व्यक्तिगत हितसंबंधांचे अथवा मायेचे पटल बँकेच्या आर्थिक व्यवहारात आणल्यामुळे अनेक बँका नुकसानीत आल्याची माझी खात्री झाली आहे. म्हणून यापैकी कोणतेही हितसंबंध आडवे येऊ न देता बँकिंगशास्त्रातील अर्थव्यवहार-संहितेचे काटेकोर पालन करणे हे पहिले पथ्य मला सांगावेसे वाटते. कोणत्याही ग्राहकाच्या कर्जमागणीच्या अर्जाचा विचार करताना व्यक्तिगत भीडभाड अथवा हितसंबंध आड येऊ न देता काटेकोर व्यवहार करणे अवश्य असते. बँकेतर्फे कर्जाऊ दिला जाणारा पैसा हा बँकेच्या खातेदारांनी विश्वस्तपणे ठेव म्हणून ठेवलेला असतो, आणि त्याच्या वसुलीवरच बँकेचे अधिक यशापयश अवलंबून असते हे लक्षात घेता सुयोग्य कर्जमंजुरी ही सहजच बँकेच्या यशस्वी अर्थव्यवहाराची गुरुकिल्ली बनते.

### प्रामाणिकपणाची सत्त्वपरीक्षा

बँकेच्या व्यवस्थापकाच्या ठायी साम, दाम, दंड आणि भेद यांच्या अतीत राहण्याची सिद्धी आल्याखेरीज खातेदारांशी सचोटीचे व्यवहार करणे त्यास साधणार नाही, असे मला नेहमीच वाटते. जो बँक व्यवस्थापक स्वतःशी प्रामाणिक असेल तोच खातेदारांशी शंभर टक्के प्रामाणिकपणे वागू शकेल. माझ्या ३७ वर्षांच्या बँकिंग आयुष्यात माझ्या प्रामाणिकपणाची सत्त्वपरीक्षा पाहणारे अनेक प्रसंग मी अनुभवले आहेत. एका शेअर ब्रोकरने त्यांचा कॅशक्रेडिटचा अर्ज मी पास करावा यासाठी रु. १५० चा एक चेक मी न देतलेल्या डिफर्ड शेअर्सचे डिव्हिडंड म्हणून मजकडे पाठवला होता. अन्य एका खातेदाराने त्याच्या कर्जाचा अर्ज मंजूर व्हावा म्हणून मिठाईच्या डब्यात चलनी नोटा घालून मजकडे पाठवल्या होत्या. हे दोन्ही पैसे मी साभार परत केले आणि असे पुन्हा न करण्याविषयी खडसावले. कर्जाचा अर्ज मंजूर होण्यास विलंब झाल्यास जोगांना काही 'पानसुपारी' हवी आहे का, अशी विचारणा बँकेच्या प्रारंभीच्या काळी माझ्या सहाय्यकांना होत असे. अशा लोकांना मी तर अत्यंत तिरसटपणे झटकून टाकत असेच, परंतु या लोकांना बँकेपासून चार हात दूर ठेवण्याची सूचना माझ्या सहकाऱ्यांना देत असे. बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतरच्या काळात आपल्या माणसाच्या अर्जाकडे जरा पाहण्याविषयी कधी प्रेमळ तर कधी हुकमी आवाजात सुचविणाऱ्या टेलिफोन्सचे प्रमाण वाढले आहे. या साऱ्या दिव्यांमधून बँक व्यवस्थापकास स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धीनुसार काम करणे दिवसेंदिवस कठीण होत जाणार आहे.

### कर्जदार हा सन्माननीय ग्राहक

खातेदारांच्या अस्थानी दबावापुढे मी कधीच नमत नसलो, तरी आपल्या आर्थिक अडचणी त्याने मनमोकळेपणाने सांगाव्यात, याबद्दल मी नेहमीच प्रयत्नशील राहिलो आहे. कोणी कर्ज मागावयास आला की त्याला काटकसरीच्या आवश्यकतेचे उपदेशाचे डोस पाजण्याचा, जागतिक अर्थकारणाविषयी त्याला लांबलचक बौद्धिक सुनवायचा अथवा संभाव्य कर्जदाराच्या आर्थिक पतीविषयी किंवा कसोटीविषयी कुत्सित हेत्वारोप करण्याचा मोह मी नेहमीच कटाक्षाने टाळलेला आहे. 'तुझे काम होणे फार अवघड आहे,' असे सांगून ग्राहकाला घाबरवून टाकावयाचे, अथवा 'तुझे काम झालेच असे समज,' असे फुकाचे आश्वासन देण्याचे सनसनाटी प्रकार मी कधीच केलेले नाहीत. आदर्श बँकरने नेहमी डॉक्टर-प्रमाणे मितभाषी, वास्तवदर्शी आणि क्रियाशील असावे, असे मी मानीत आलेलो आहे. त्यानुरूपच ग्राहकाशी माझे वर्तन असते. बँकेकडून कर्ज मागावयास येणारी व्यक्ती भिकारी म्हणून अथवा

चोर म्हणून घेत नसून सन्माननीय ग्राहक म्हणून घेत असते; त्यास तशीच सन्माननीय वागणूक देणे हे सुसंस्कृतपणाचे लक्षण आहे अशी माझी श्रद्धा आहे.

### बँकेच्या व्यवहाराविषयी गुप्तता

ग्राहकांच्या आर्थिक व्यवहारातील काटेकोरपणानेच त्यांनी विश्वासाने सांगितलेल्या गोष्टीविषयी गुप्तता पाळण्याच्या बाबतीतही मी प्रथमपासूनच दक्ष राहिलो आहे. एका ग्राहकाच्या अर्थव्यवहाराची वाच्यता अन्य ग्राहकाजवळ, मित्रमंडळीमध्ये, इतकेच नव्हे, तर स्वतःच्या घरच्या मंडळीपाशीही न करण्याची शिस्त प्रारंभीपासून मी स्वतःचे ठायी बाणवली आहे. स्वतःच्या डॉक्टरजवळ अथवा वकिलाजवळ ग्राहकाने केलेल्या गौप्यस्फोटाप्रमाणेच बँकरला सांगितलेल्या गोष्टीही घटकर्णी होता कामा नयेत, तसे केल्याने ग्राहकाचा विश्वासघात होईल, हे पथ्य मला फार महत्त्वाचे वाटते. या बाबतीत एक उदाहरण मुद्दाम सांगण्यासारखे आहे. महाराष्ट्र बँकेने कर्जाऊ पैसे दिलेल्या पुण्यातील एका सुविख्यात कंपनीला १५ लाख रुपयांचे नुकसान आले. याबाबतीत माझ्या व्यक्तिगत नियमानुसार माझ्या वडिलांजवळही मी वाच्यता केली नाही. दुसऱ्या दिवशी माझे वडील मुंबई विद्यापीठाच्या सिनेटच्या मीटींगला मुंबईला गेले असता सर विठ्ठल चंदावरकरांनी त्यांना महाराष्ट्र बँकेच्या एका कॉन्ट्रॅक्टिंग ग्राहकाचे दिवाळे वाजल्याच्या अफवेविषयी विचारले. तेव्हा बँकेच्या खाजगी व्यवहाराविषयी आपला मुलगा घरी काहीच बोलत नसल्याचे माझ्या वडिलांनी त्यांना लिहून सांगितले.

ग्राहकांच्या आर्थिक व्यवहारांची गुप्तता पाळण्याचे हे पथ्य नव्या पिढीतील बँकिंग अधिकारी पाळत नाहीत असे मोठ्या कष्टाने म्हणावेसे वाटते. या अधिकाऱ्यांच्या बायकांना बँकेच्या दैनंदिन व्यवहाराची खडान् खडा माहिती तर असतेच, परंतु कधीकधी स्वतःलाच बँकेचे व्यवस्थापक समजून कर्जदारांना अनाहूत सूचनाही या बायका देतात.

### कोणतेही काम कमी प्रतीचे नाही

बँकिंग व्यवसायातील क्लार्कच्या जागेपासून चढत जाऊन चेअरमन आणि कस्टोडियन ही सर्वोच्च अधिकाराची पदे मी उपभोगली असल्याने या व्यवसायातील कोणतेही काम मला अपरिचित अथवा कमी प्रतीचे वाटत नाही. मजकडे आलेल्या खातेदाराच्या पैसे भरण्याच्या स्लिपा अगदी अलिकडच्या काळापर्यंत मी स्वतः भरून देत असे. सवड असेल तर अजूनही देतो. बँक ऑफ बडोदामध्ये काम करीत असता, बडोद्याच्या व्हॉल्टमधील पुराचे पाणी मी स्वतःच्या हातांनी उपसले आहे. सुमारे २० वर्षांनंतर पानशेत जलप्रलयाप्रसंगी याच इतिहासाची पुनरावृत्ती पुणे येथील डेक्कन जिमखाना शाखेत झाली. सहकाऱ्यांच्या गैरहजेरीत महाराष्ट्र बँकेच्या साऱ्या पत्रव्यवहारावर एकट्याने सह्या करण्याचा विक्रमहि मी अनेक वेळा केला आहे. त्यामुळे कोणा कनिष्ठ सहकाऱ्याचा काम फार असल्याचा बाऊ मी चालू देत नाही. तसेच काम फार असल्याची त्याची दटावणीही ते काम लीलया स्वतः करून दाखवून मी परतवून लावतो.

### नमुनेदार वागणुकीची खबरदारी

आर्थिक देवघेवीच्या साधनाने समाजाच्या प्रत्येक अंगावर नियंत्रण ठेवणाऱ्या बँकिंग व्यवसायाचे नेतृत्व ही अत्यंत अवघड अशी तारेवरील कसरत असल्याची जाणीव मी मनाशी सदैव बाळगली आहे. राजकीय पक्ष, कारखानदारांच्या विभिन्न संघटना आणि तदनुषंगिक गट, व्यापाऱ्यांच्या प्रादेशिक संस्था, या साऱ्यापासून सदतीस वर्षांच्या बँकिंग कारकीर्दीत मी अलिप्त राहिलो आहे. कोणत्याही पंथाचे अथवा पक्षाचे लेबल मला चिकटणार नाही, याची मी काळजी घेतली आहे. बँकिंगसारख्या नाजूक स्वरूपाचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीवर समाजातील लोक शतावधी, सहस्रावधी नेत्रांनी पहारा करीत असतात याचा विसर मी कधीच पडू दिलेला नाही. कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी आपली वागणूक नमुनेदारच ठरेल अशी खबरदारी मी घेतली आहे.

### महाराष्ट्र बँकेविषयी अद्वैत

विश्वासू कर्मचारी हे बँकेचे खरेखुरे आधारस्तंभ आहेत असे माझे अनुभवसिद्ध मत आहे. त्यामुळेच बँकेमध्ये नव्याने भरती केलेला नोकरवर्ग हा चांगल्या कुटुंबातील असेल, याविषयी व्यक्तिशः मी अत्यंत जागरूक राहिलो आहे. ग्राहकाप्रमाणेच नोकरवर्गालाही महाराष्ट्र बँक ही आपली स्वतःची बँक वाटून आपले सारे कर्तृत्व तो बँकेच्या कारणी वाहून टाकील अशी निष्ठा मी आमच्या कर्मचाऱ्यांमध्ये जोपासली आहे. साऱ्या आयुष्यभर महाराष्ट्र बँकेखेरीज अन्य बँकेचा अथवा तेथील मोठ्या पगाराच्या नोकरीचा विचार मी कधीच केला नाही. बँकेचा नावलौकिक हा स्वतःच्या लौकिकाहून अधिक जपला. बँकेच्या कार्यकौशल्याबद्दल कोणी निंदकाने कुत्सितोद्गार काढताच जणू ते स्वतःला उद्देशून आहेत असे समजून क्रुद्ध झालो. महाराष्ट्र बँकेशी माझ्या मनी असणारे हे अद्वैत आमच्या कर्मचाऱ्यांच्या ठायीही रुजवावे यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहिलो आहे. परंतु बँक जसजशी मोठी होत गेली, तसतशी तीमधील नवीन कर्मचाऱ्यांच्या भरतीची पद्धतीही अधिक यांत्रिक बनू लागली आहे. कर्मचाऱ्यांशी व्यक्तिक संबंध ठेवणेहि या वाढत्या विस्तारामुळे दिवसेंदिवस कठीण होऊ लागले आहे. या साऱ्याच गोष्टी बँकेच्या वाढत्या व्यापामुळे क्रमप्राप्त आणि म्हणूनच अपरिहार्य असल्या, तरी एकीकडे खातेदार आणि दुसरीकडे कर्मचारी यांच्याशी अभिप्रेत असणारे सौहार्द या विस्तार-प्रक्रियेमध्ये कोठेतरी हरवले जात आहे, याचे राहून राहून दुःख वाटल्यावाचून रहात नाही.

### समाजसेवेचे बाळकडू

स्वतःचे नियत कर्तव्य समाजजीवन समृद्ध करण्याच्या व्यापक कृतीमधून करण्याचे, तसेच हे नियत कर्तव्य करीत असतानाच

सर्वांगीण समाजसेवेचे काही ना काही काम निःस्वार्थीपणे करण्याचे बाळकडू माझे वडील प्राचार्य जोग यांजकडून मला लाभले. ब्रिटिश जमान्यातील आय. सी. एस. अधिकाऱ्यांमध्ये अन्य काहीही दोष असले तरी प्रशासन कार्यातून वेळात वेळ काढून काही ना काही सामाजिक व सांस्कृतिक कार्य करण्याचा त्यांचा कटाक्ष कित्ता गिरवण्याजोगा असल्याचा दाखला ते नेहमी देत असत. नफ्यातोट्याच्या धारवाडी काट्यावर चालणारा बँकिंगचा व्यवसायही मी समाजाच्या अर्थकारणाची समृद्धी आणि विकास व्हावा, अशा विधायक दृष्टीने केला, याचा मला अभिमान वाटतो. त्याचप्रमाणे बँकिंग क्षेत्रातील कामामध्येच स्वतःला गाडून न घेता महाराष्ट्रातील विविध शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यांना यथाशक्य साह्य मी केले. महाराष्ट्रातील सार्वजनिक संस्था आणि सार्वजनिक कार्यकर्ते यांना बँकेने कर्जरूपाने आर्थिक साह्य करावे यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहिलो.

## निरपेक्ष आणि प्रामाणिक सल्ला

बँकिंग क्षेत्रातील माझ्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा अनेक सार्वजनिक संस्थांना मी दिला. निरपेक्ष सल्लामसलत आणि प्रामाणिक मतप्रदर्शन या गोष्टी अनेक सार्वजनिक संस्थांच्या बाबतीत मी व्रताप्रमाणे पाळीत आलो आहे. 'जोगांच्या पैशाला यश आहे' अशी अनेक संस्थाचालकांची मनोमन श्रद्धा असल्याने गावातील असंख्य संस्थांचा मी खजिनदारही आहे. अनेक उच्चपदस्थ लोक सार्वजनिक कार्यही स्वार्थपरायण वृत्तीने करीत असल्याचे दृश्य आज प्रत्यक्ष पहावयास मिळते. गेल्या तीस वर्षांत असे पाप माझ्या हातून कधीही घडले नाही, असे मला मोठ्या अभिमानाने नमूद करावेसे वाटते.

## नवी चमत्कारिक परिस्थिती

माझ्या साठ वर्षांच्या आयुष्यात मी मनोमन जपलेला हिशेबीपणा, कायद्यासंबंधीचा काटेकोरपणा आणि दैनंदिन व्यवहारातील स्पष्टवक्तेपणा हे सारे सद्गुण, दुर्गुण ठरावेत अशा चमत्कारिक सामाजिक परिस्थितीतून सध्या आपण जात आहोत. ज्या गुणांनी आजवरच्या आयुष्यात यश आणि कीर्ती प्राप्त झाली, ते गुणच अपकीर्तिकारक ठरतील की काय अशी सध्या भीती वाटते. परंतु म्हणून या गुणांचा आणि स्वभाववैशिष्ट्यांचा त्याग करावा असे मला वाटत नाही. कारण हे सारे आज माझ्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनून गेले आहेत. आयुष्याच्या प्रारंभिक काळी प्रयत्नपूर्वक अंगी बाणवलेली जीवनमूल्ये उत्तर आयुष्यात स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग बनत असतात. माझ्या बाबतीतही तसेच काहीसे झाले आहे.

---



## भारतातील सर्वात मोठ्या ४० कंपन्या

(स=सरकारी कंपनी)

| सर्व कं. अ. | खा. क्षे. कं. अ. | नाव | एकूण जिंदगी (कोटी रु.) |
|---|---|---|---|
| १ | | हिंदुस्तान स्टील | १०२६ स |
| २ | | फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया | ५४९ स |
| ३ | | हिंदुस्तान फर्टिलायझर | ३३० स |
| ४ | | इंडियन ऑईल कंपनी | २७४ स |
| ५ | | ऑईल अँड नॅचरल गॅस | २६७ स |
| ६ | | हेवी इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन | २५१ स |
| ७ | | फर्टिलायझर कॉर्पोरेशन | २४४ स |
| ८ | | भारत हेवी इलेक्ट्रिकल्स | २३३ स |
| ९ | | नॅशनल कोल डेव्ह. कॉर्पोरेशन | २०६ स |
| १० | १ | टाटा स्टील | १८६ |
| ११ | | नेव्हेली लिग्नाइट | १५४ स |
| १२ | | एअर इंडिया | १२५ स |
| १३ | | शिपिंग कॉर्पोरेशन | १२३ स |
| १४ | | हेवी इलेक्ट्रिकल्स | १२१ स |
| १५ | २ | टाटा इंजिनिअरिंग अँड लोको | १२० |
| १६ | ३ | इंडियन आयर्न | ११९ |
| १७ | ४ | असोशिएटेड सिमेंट | १०५ |
| १८ | | फर्टिलायझर्स अँड केमिकल्स | १०२ स |
| १९ | ५ | ग्रेट लेक्स | ८७ |
| २० | | इंडियन एअरलाइन्स | ८४ |
| २१ | ६ | ऑईल इंडिया | ८० |
| २२ | ७ | सिंधिया स्टीम | ७४ |
| २३ | ८ | हिंदुस्तान मोटर्स | ७० |
| २४ | ९ | इंडियन एक्सप्लोसिव्हज् | ६५ |
| २५ | १० | इंडियन अॅल्युमिनम | ६४ |
| २६ | ११ | गुजरात स्टेट फर्टिलायझर्स | ६३ |
| २७ | | स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन | ६१ स |
| २८ | १२ | हिंद अॅल्युमिनम | ६० |
| २९ | | इंडियन ड्रग्ज अँड फार्मा | ५९ स |
| ३० | १३ | कलकत्ता इलेक्ट्रिक | ५७ |
| ३१ | १४ | नोसिल | ५३ |
| ३२ | १५ | इंडियन टोबॅको | ५३ |
| ३३ | | नॅशनल मिनरल्स डेव्ह. कॉर्पोरेशन | ४९ स |
| ३४ | १६ | कोरोमांडल फर्टिलायझर्स | ४८ |
| ३५ | | मद्रास रिफायनरीज | ४७ स |
| ३६ | | भारत इलेक्ट्रॉनिक्स | ४६ स |
| ३७ | | हिंदुस्तान मशीन टूल्स | ४६ स |
| ३८ | १७ | व्होल्टाज | ४४ |
| ३९ | १८ | डनलॉप | ४३ |
| ४० | १९ | हिंदुस्तान लिव्हर | ३९ |

### भारतातील कंपन्यांची वैशिष्ट्ये

(१) भारतातील सर्वात मोठ्या १०१ कंपन्यांपैकी पहिल्या नऊ कंपन्या पब्लिक सेक्टरमधील आहेत.

(२) १९६६-६७ मध्ये टाटा स्टीलचा अनुक्रम ४ था होता. तो आता १० वा झाला आहे.

(३) पहिल्या १५ कंपन्यांत १९६६-६७ मध्ये प्रायव्हेट सेक्टरमधील ३ कंपन्या होत्या; आता फक्त २ च आहेत.

(४) टिस्को कंपनी प्रायव्हेट सेक्टरमधील सर्वात मोठी कंपनी आहे; दुसरा अनुक्रम टेल्कोचा आहे. पण त्यांच्या जिंदगीत किती तरी फरक आहे. (जिंदगी अनुक्रमे १८६ कोटी रु. आणि १२१ कोटी रु.).

(५) प्रायव्हेट सेक्टरमधील पहिल्या १०१ कंपन्यांपैकी ९ कंपन्या टाटा उद्योग समूहातील असून त्यांची एकूण जिंदगी ४८६ कोटी रु. आहे. बिर्लांच्या १० कंपन्यांची एकूण जिंदगी ३४१ कोटी रु. आहे. त्या खालोखाल मफतलाल उद्योग समूह येतो. (५ कंपन्या; १२५ कोटी रु. जिंदगी)

(६) प्रायव्हेट सेक्टरमधील पहिल्या १०१ कंपन्यांपैकी २७ कंपन्यांत परकीय भांडवलाचा भरणा खूप मोठा आहे. त्या सर्वांची एकूण जिंदगी ७६० कोटी रु. असून १०१ कंपन्यांच्या एकूण जिंदगीच्या ती २३ % भरते.

### प्रायव्हेट सेक्टरमधील सर्वात मोठ्या ४० कंपन्या

एकूण जिंदगीच्या दृष्टीने पहिल्या १९ लिमिटेड कंपन्यांची माहिती डावीकडच्या तक्त्यात दिली आहे. त्यानंतरचे अनुक्रम पुढीलप्रमाणे आहेत.

| अनुक्रम | नाव | एकूण जिंदगी (कोटी रु.) |
|---|---|---|
| २० | ई. आय. डी. पॅरी | ३९ |
| २१ | ग्रेट ईस्टर्न शिपिंग | ३९ |
| २२ | टाटा पॉवर | ३८ |
| २३ | सेंचरी स्पिनिंग | ३८ |
| २४ | युनियन कार्बाइड | ३८ |
| २५ | कॅलिको मिल्स | ३८ |
| २६ | बिन्नी | ३७ |
| २७ | गेस्ट, कीन, विल्यम्स | ३६ |
| २८ | ग्वालियर रेयॉन | ३६ |
| २९ | ओरिएंट पेपर | ३२ |
| ३० | जनरल इलेक्ट्रिक | ३० |
| ३१ | फिलिप्स इंडिया | ३० |
| ३२ | एस्कॉर्टस | २९ |
| ३३ | लार्सन अँड टोब्रु | २९ |
| ३४ | ब्रुक बाँड | २८ |
| ३५ | एस्सो स्टँडर्ड | २८ |
| ३६ | प्रीमिअर ऑटो | २८ |
| ३७ | अहमदाबाद इलेक्ट्रिकल्स | २७ |
| ३८ | जे. के. सिंथेटिक्स | २७ |
| ३९ | महिंद्र अँड महिंद्र | २७ |
| ४० | किर्लोस्कर ऑईल | २६ |

पुण्यतिथीनिमित्त श्रद्धांजली

# कै. नारायणराव सोपानराव बोरावके

## शेती, शिक्षण, सामाजिक, औद्योगिक क्षेत्रांतील कामगिरी



श्री. नारायणराव सोपानराव बोरावके ह्यांचा जन्म दि. १७ ऑक्टोबर १८९२ रोजी झाला. त्यांचे शिक्षण मराठी ७ वी पर्यंत झाले. त्यांनी शेती, शिक्षण, सहकार, इत्यादी क्षेत्रांत अत्यंत भरीव कार्य केले आहे. उसाच्या अनेक जातींची लागवड करून उत्पादनवाढही घडवून आणली आहे. फळझाडे, संत्रे, मोसंबी, चिक्कू, ग्रेपफ्रूट ह्यांची रोपे व कलमे तयार करण्यातही त्यांची कामगिरी महत्त्वाची आहे. १९२९ ते १९३५ ते अहमदनगर जिल्हा लोकलबोर्ड सभासद होते. सरकारी डिव्हिजनल बोर्डाचेही सभासद होते. १९५३ मध्ये पुण्यातील पुष्कळ समितीचे खजिनदार म्हणून त्यांनी काम केले. महात्मा गांधी शेतकी प्रदर्शन, कोपरगाव, ह्यांचे स्थापनेपासून काम केले.

### शैक्षणिक कार्य

रानातील वस्तीवर राहाता चारी नं. १५ येथे प्राथमिक शाळा सुरू केली. श्रीरामपूर येथे नारायणराव बोरावके कॉलेज १९६० मध्ये स्थापन केले. रयत शिक्षण संस्थेतर्फे पक्क्या इमारतीचे बांधकाम चालू आहे. रयत शिक्षण संस्थेचे ते उपाध्यक्ष होते. विद्यार्थी वसतिगृहे, हायस्कुले, महाराष्ट्र व्यायाम शाळा, इत्यादींना आर्थिक मदत केली आहे. क्षत्रिय माळी एज्युकेशन सोसायटीचे ते अध्यक्ष होते. सासवड येथील लक्ष्मीबाई विद्यार्थी वसतिगृहासही त्यांनी मदत केली आहे.

### शेती व्यवसाय

(१) सहकारी साखर कारखाना कोळपेवाडी-कोपरगाव, स्थापनेचेवेळी जास्तीत जास्त शेअर भांडवल देऊन, जमवून कारखाना उभारणीस मदत केली. (२) गणेश सहकारी साखर कारखाना राहाता, यांना स्थापने वेळी शेअर भांडवल मिळवून देण्याचे कामी व कारखान्यास जमीन मिळवून देण्याचे कामी मदत केली. (३) सन १९३२ मध्ये महाराष्ट्रात सहकारी तत्त्वावर पहिला साखर कारखाना शेतकऱ्याच्या भांडवलावर व संघटनेवर दि सासवड माळी या नावाचा साखर कारखाना सोलापूर जिल्ह्यातील अकलूज गावी काढून त्यांचे संचालक मंडळामध्ये कारखाना स्थापनेपासून संचालक म्हणून काम करीत होते. (४) शेती व्यवसाय सुधारणा, बैलाच्या नांगरा ऐवजी यांत्रिक ट्रॅक्टर्स व औजारे, बैलांच्या मोटे ऐवजी ऑईल एंजिन, पाण्याचे पंप व इलेक्ट्रिक पंप बसवून, लिफ्ट इरिगेशनवर शेती केली. (५) सरकारी पद्धतीने कंपोस्ट खते तयार करून वापरली. (६) गव्हाच्या व कपाशीच्या सुधारलेल्या जाती लावून उत्पादनवाढ केली. (७) हायब्रीड ज्वारीचे बी तयार करून सोलापूर जिल्हा परिषदेला पुरविले. (८) कमर्शियल हायब्रीड ज्वारीची पिके घेऊन धान्यउत्पादनात वाढ केली. (९) हायब्रीड मकेचे बी तयार केले. याप्रमाणे धान्यउत्पादन तयार करण्याचे कामी भाग घेतला.

### इतर कार्य

कोपरगाव तालुक्यातील कसबे राहाते गावात जनावरांचा दवाखाना काढून दोन वर्षे चालवून ग्रामपंचायतीचे ताब्यात दिला. औद्योगिक क्षेत्रामध्ये किर्लोस्कर बंधू लि. किर्लोस्करवाडी या कंपनीच्या संचालक मंडळामध्ये संचालक म्हणून होते.

लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्युझियम पुणे विश्वस्त समितीवर सभासद होते. दि बँक ऑफ कराड, लि. कराडचे डायरेक्टर म्हणून होते.

---

## श्री. वसंतराव वैद्य ह्यांचा परदेश दौरा

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वसंतराव वैद्य रविवार दि. १३ फेब्रुवारी रोजी विमानाने लंडनला रवाना झाले. ग्रेटब्रिटन, फ्रान्स, जर्मनी आणि इटली येथील व्यापारी बाजारपेठांना भेट देऊन तेथे स्वस्तिकच्या उत्पादनांच्या निर्गतीच्या विस्ताराच्या दृष्टीने ते विचारविनिमय करतील. फेब्रुवारीचे अखेरीस ते परत येतील.

## परदेशी कंपन्यांनी किती पैसा नेला?

हिंदमध्ये उद्योगधंदा करणाऱ्या परदेशीय मालकीच्या अगर त्यांच्या हिंदी भागीदारीच्या कंपन्यांमार्फत १९७०-७१ साली ५४ कोटी रुपयांपेक्षा अधिक पैसा परदेशी धाडण्यात आला. त्यामागील साली ४३ कोटी रुपये पाठविण्यात आले होते. नफा, भागभांडवलावरील डिव्हिडंड, तांत्रिक ज्ञानाबद्दल यावी लागणारी फी आणि रॉयल्टी, ह्याच्या रूपाने हा पैसा परदेशांत गेला. १९५६ च्या कंपनी कायद्यातील कलम ५१ ह्यात परदेशीय कंपनी आणि परदेशी कंपनीच्या सहकार्याने चालविलेल्या हिंदी कंपन्या ह्यांच्या व्याख्या दिलेल्या आहेत. ३१ मार्च १९७० ह्या दिवशी भारतात ५६१ परदेशीय कंपन्या व्यापार-व्यवहार करीत होत्या, त्याशिवाय परदेशी कंपन्यांच्या भागीदारीत चाललेल्या २२३ हिंदी कंपन्या होत्या. ह्या कंपन्यांच्या कारभारावर फॉरिन एक्स्चेंज रेग्युलेशन ॲक्टमधील तरतुदीप्रमाणे नियंत्रण ठेवण्यात येत असते.

## लॉटऱ्या अपेक्षेप्रमाणे यशस्वी नाहीत

लॉटऱ्यांच्या उपयोग काळा पैसा पांढरा करण्याकडे केला जात आहे. बक्षिस मिळालेली तिकिटे बक्षिसाच्या रकमेच्यापेक्षा ५० % केव्हाही जास्त किंमत देऊन विकत घेतली जातात. लॉटऱ्यांमुळे राज्य सरकारांच्या उत्पन्नात वाढ होण्याऐवजी जास्त काळा पैसा निर्माण होण्यास मदत होत आहे. लॉटरीचे सामान्य जनतेला प्रथमी वाटणारे आकर्षण आता कमी झाले आहे. १९७१ मध्ये १२ राज्य सरकारांना मिळून लॉटऱ्यांपासून २१-२२ कोटी रु. हे निव्वळ उत्पन्न मिळाले. २-१२ कोटी रु. ची बक्षिसे घेण्यास तिकीटवाले पुढे आलेच नाहीत, कारण अशिक्षित लोकांना वृत्तपत्रातील बक्षिसाच्या नंबरांच्या जाहिराती वाचताच येत नाहीत. बक्षिसाचे तिकीट काळ्या बाजारात विकता येऊ नये, यासाठी तिकीट विकते वेळी काउंटर फॉईलवर खरेदीदाराची सही किंवा अंगठा घेणे सक्तीचे करण्यात यावे, असे सुचविण्यात येत आहे. लॉटऱ्या चालविणाऱ्या १२ राज्यांचा १९७१ मध्ये लॉटरीपासून केलेल्या कमाईचा आणि पडून राहिलेल्या बक्षिसांचा तपशील पुढे दिला आहे.

| राज्य | निव्वळ उत्पन्न (लक्ष रु.) | पडून राहिलेली बक्षिसे (लक्ष रु.) |
|---|---|---|
| आसाम | ९०-६५ | ५-१० |
| बिहार | ४०-०० | ५-०० |
| हरयाणा | ३६०-०० | .६-९१ |
| हिमाचल प्रदेश | ५-६४ | ४-९९ |
| महाराष्ट्र | २५८-२७ | ३२-३५ |
| मध्य प्रदेश | ४४-५३ | १७-२३ |
| म्हैसूर | ४२८-०० | ४७-०० |
| ओरिसा | २४७-०० | ३-४५ |
| पंजाब | २५४-०० | २४-६९ |
| तामिळनाडू | १४०६-५४ | ६१-०६ |
| प. बंगाल | ६७-६९ | १२-२९ |
| गोवा | २०-२२ | १-७१ |

## राजस्थान कालव्यासाठी दर साल १० कोटी रु.

राजस्थान कालवा योजना ही एक राष्ट्रीय महत्वाची योजना आहे. ही सर्व योजना पूर्ण होण्यासाठी २७० कोटी रुपये लागतील असा अंदाज करण्यात आला आहे. गेल्या मार्च अखेर योजनेतील कामावर ७२ कोटी रुपये खर्च झाले होते. दरसाल १० ते १२ कोटी रुपये खर्च करण्यात आले तर सर्व योजना पार पाडणे १० वर्षांच्या काळावधीत शक्य होईल. हे काम करण्यासाठी लागणारी संघटना तयार झालेली आहे. पण पैशाची मात्र अडचण आहे. राष्ट्रीय महत्त्वाची म्हणून जाहीर झालेल्या या योजनेला मध्यवर्ती सरकारकडून पुरेसा पैसा देण्यात येत नाही. योजना कार्यवाहीत आणण्याची जबाबदारी राज्यसरकारावर आहे. राजस्थानचा वायव्य भाग हा वरचे वाळवंट म्हणून प्रसिद्ध आहे. हीच भूमी समृद्ध करण्यासाठी योजना तयार करण्यात आली आहे. ती पूर्ण झाल्यावर ५० लाख एकर जमिनीला पाणी पुरवठा करणे तांत्रिक दृष्ट्या शक्य होईल.


## वांच्छू कमिटीचा अहवाल सादर झाला

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश श्री. वांच्छू ह्यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष करपद्धतीसंबंधी चौकशी करून अहवाल तयार करण्यासाठी कमिटी नेमण्यात आली होती. ह्या कमिटीने आपला अहवाल आता सरकारला सादर केला आहे. अर्थमंत्री श्री. चव्हाण ह्यांनी देशात एक स्वतंत्र व अनधिकृत अर्थव्यवस्था चालू असल्याचे गेल्या अंदाज-पत्रकी अधिवेशनाच्या वेळी मान्य केले होते. त्यांचा रोख बिनहिशेबी काळ्या पैशाच्या जोरावर चालणाऱ्या आर्थिक व्यवहारावरच होता. त्यावरून काळ्या पैशाचा प्रश्न किती गंभीर बनला आहे ते कळून येते. भारत सरकारचे अर्थखाते वांच्छू कमिटीच्या अहवालाचा सध्या अभ्यास करीत आहे. १९७२-७३ सालच्या अंदाजपत्रकावर ह्या अहवालाचा परिणाम होण्याची शक्यता आहे. काळ्या पैशाचा किती साठा आहे ह्याबद्दल अनेक अंदाज ह्या विषयातील तज्ज्ञांनी व्यक्त केले आहेत. पण तसा निश्चित आकडा कोणालाच सांगता येत नाही. वांच्छू कमिटीलाही व्यवहारात असलेल्या काळ्या पैशाबद्दल विश्वासार्ह अंदाज देता आलेला नाही. तथापि काळ्या पैशाच्या साह्याने होणाऱ्या व्यवहाराला आळा घालण्यासाठी काही शिफारशी कमिटीने केलेल्या आहेत. गेल्या मे महिन्यात कमिटीने आपला हंगामी अहवाल सादर केला होता. दुसऱ्याच्या नावावर मालमत्ता खरेदी करून काळा पैसा सहाजीम करता येऊ नये म्हणून हंगामी अहवालात काही सूचना केल्या होत्या. त्या सरकारने स्वीकारल्या आहेत. कर चुकविण्याच्या अनेक क्लृप्त्या उपलब्ध असल्यानेही काळ्या पैशांची निर्मिती होत असते. म्हणून कर चुकविणे अशक्य, निदान कठीण करण्यासंबंधीही कमिटीने चौकशी व शिफारसी करावयाच्या होत्या. मोठ्या रकमांच्या चलनी नोटा रद्द करण्याची सूचना कमिटीने त्या वेळी केली होती, पण सरकारने ती स्वीकारली नाही. ह्या सर्वच प्रश्नां-संबंधीचे एक बिल लोकसभेच्या सिलेक्ट कमिटीपुढे आहे.

## संयुक्त राष्ट्र संघटनेच्या चिटणिसांचा पगार वाढला

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या चिटणिसांचा पगार वाढविण्याचा निर्णय संघटनेच्या आमसभेने घेतला आहे. मूळ वार्षिक पगारात आता १२,५०० डॉलर्सची वाढ करण्यात आली असल्याने चिटणिसांना सालीना ६२,५०० डॉलर्स पगार मिळेल, आणि ह्या रकमेच्या निम्मे निवृत्तिवेतन मिळू लागेल. ही पगारवाढ १ डिसेंबर, १९७१ पासून अमलात येणार आहे. सध्याचे चिटणीस उ थांट ह्या वर्षअखेर सेवानिवृत्त होणार आहेत. नव्या पगाराचा व सेवानिवृत्तीच्या वेतनाचा फायदा मिळणारे ते पहिले चिटणीस असतील. पूर्वीची परिस्थिती चालू राहाती तर त्यांना जितके निवृत्तिवेतन मिळाले असते त्याच्या दुप्पट आता मिळेल. पगार-वाढीच्या निर्णयाला ९५ देशांनी पाठिंबा दिला. विरोध कोणी केला नाही. ८ देशांनी मत दिले नाही.


कार्यक्षम आणि फायदेशीर पंपाची परीक्षा कशी कराल?
किर्लोस्कर 'केडी' मोनोब्लॉक पंप
विजेच्या खर्चात बचत होते.
पंपाची बांधणी मजबूत असल्यानें झीज कमी व त्यामुळें दुरुस्तीचा खर्च कमी होतो.
"हा पंप २७ फुटापर्यंतचे खोल पाणी सहज खेचू शकतो. त्यामुळे तो वारंवार जागचा हालवावा लागत नाही."
कमी वेळांत जास्त पाणी ओढू शकतो. त्यामुळे कामाचा जलद उरक व मजूरीच्या खर्चात बचत होते.
"याचे डिझाईन सुबक व आटोपशीर आहे. त्यामुळे जागा कमी लागते."
"सुटे भाग ताबडतोब मिळू शकतात."
खर्चात होणाऱ्या बचतीमुळे किर्लोस्कर 'केडी' पंपाची किंमत लवकर वसूल होते व कर्जफेडीची हमी देता येते.
सोपी रचना, सुबक कारागिरी, बळकट व आटोपशीर बांधणी या वैशिष्ट्यामुळें किर्लोस्कर 'केडी' पंप अधिक कार्यक्षम असून ते विपुल प्रमाणात पाणी पुरवठा करतात.
किर्लोस्कर ब्रदर्स लि; उद्योग भवन. टिळक रोड, पुणे २



तुमच्या हौसेच्या वस्तु तुम्हांला अशाच वारंवार खरेदी करता याव्यात असे वाटते ना? बँक ऑफ महाराष्ट्रच्या रिकरींग डिपॉझीट मधे नियमित पणें पैसे गुंतवा.

बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिस: ११७७ बुधवार पेठ, पुणे २.


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)